# पनवेल महानगरपालिका

## ता.पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२- २७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२- २७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

# पदभरती जाहिरात शुद्धीपत्रक - १

पनवेल महानगरपालिका पदभरतीची जाहिरात क्र.१/२०२३, दि.१३/०७/२०२३ रोजी दैनिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाली आहे. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने खालील प्रमाणे शुद्धीपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

१. शासन निर्णय क्र.अशसेके-१००६/५६/प्र.क्र.-२४/०६/नवि-२४, दि.०५/०२/२००८ नुसार होमगार्डमध्ये किमान ३ वर्षे इतकी सेवा झालेल्या व अग्निशामक पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व शारीरिक पात्रता पूर्ण करणाऱ्या व विहित पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांकरीता एकूण भरण्यात येणाऱ्या अग्निशामक पदांच्या ५% प्रमाणे एकूण ४ पदांचे समांतर आरक्षण होमगार्ड यांना लागू करण्यात येत आहे. त्यानुसार अग्निशामक, गट-क पदाचे आरक्षणामध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

अ) अग्निशामक, गट-क (Fireman, Group C)

| जात प्रवर्ग | अ.जा | अ.ज | वि.जा (अ) | भ.ज (ब) | भ.ज (क) | भ.ज (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र | आ.दु.घ. (EWS) | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जागा-७२ | ९ | ६ | २ | ३ | २ | १ | १४ | १ | ७ | २७ | ७२ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ३ | ३ | २ | २ | २ | १ | ४ | १ | ४ | ८ | ३० |
| महिला ३०% | ३ | २ | - | १ | - | - | ४ | - | २ | ८ | २० |
| खेळाडू ५% | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ | २ |
| माजी सैनिक १५% | १ | १ | - | - | - | - | २ | - | १ | ४ | ९ |
| पदवीधर अंशकालीन १०% | १ | - | - | - | - | - | १ | - | - | ३ | ५ |
| प्रकल्पग्रस्त ५% | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ | २ |
| भूकंपग्रस्त २% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| होम गार्ड (५%) | १ | | | | | | १ | | | २ | ४ |
| दिव्यांग ४% | - | | | | | | | | | | |
| अनाथ १ % | १ पद | | | | | | | | | | |

ब) अग्निशमन सेवेतील उप मुख्य अग्निशमन अधिकारी, गट-ब (Deputy Chief Fire Officer, Group-B) व उप अग्निशमन केंद्र अधिकारी, गट-क (Sub fire Officer, Group C ) या संवर्गाच्या सेवा प्रवेश नियम बदल

महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांचे पत्र क्र.मअसे-२०२३/३२-एफ/१०९२, दि.१९/०७/२०२३ या पत्रान्वये पनवेल महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मंजूर अग्निशमन सेवेतील उप मुख्य अग्निशमन अधिकारी, गट-ब (Deputy Chief Fire Officer, Group-B) व उप अग्निशमन केंद्र अधिकारी, गट-क (Sub fire Officer, Group C ) या संवर्गाचे सेवा प्रवेश नियम यामध्ये खालील प्रमाणे सुधारणा करून अंतिम करण्यात येत आहेत.

ब- १. उप मुख्य अग्निशमन अधिकारी, गट-ब (Deputy Chief Fire Officer, Group-B)

शैक्षणिक व तांत्रिक पात्रता :

१. मान्यताप्राप्त विद्यापीठातून कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.
२. राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचेकडील पदवी (बी.ई.-फायर) धारण केलेली असावी.

**किंवा**

राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा डिव्हीजनल फायर ऑफिसर पाठ्यक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका) धारण केलेली असावी.

**किंवा**

दि इन्स्टीट्युशन ऑफ फायर इंजिनिअर्स (यु.के.) किंवा (इंडिया) या संस्थेकडील सदस्यत्व (एम.आय.-फायर) किंवा कोणत्याही शाखेची पदवी प्राप्त केल्यानंतर दि इन्स्टीट्युशन ऑफ फायर इंजिनिअर्स (यु.के.) यांचे सदस्यत्व (एम.आय.- फायर) असावे.

३. महानगरपालिका/ विशेष नियोजन प्राधिकरणे/ शासकीय /निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये विभागीय अग्निशमन अधिकारी किंवा समकक्ष पदावर किमान ३ वर्षे सेवा किंवा सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी किंवा समकक्ष पदावर किमान ५ वर्षे सेवा किंवा अग्निशमन केंद्र अधिकारी किंवा समकक्ष पदावर ७ वर्षे कामाचा अनुभव आवश्यक आहे.
४. मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहिणे, वाचणे व बोलणे).
५. एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण असावा.

ब) २. उप अग्निशमन अधिकारी, गट-क (Sub Fire Officer, Group C )

<u>किमान शैक्षणिक व तांत्रिक पात्रता</u> :

१. मान्यताप्राप्त विद्यापीठातून कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.
२. राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा सब-ऑफिसर पाठ्यक्रम उत्तीर्ण असावा.

किंवा

महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, महाराष्ट्र शासन यांचा १ वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी व अग्नि प्रतिबंधक अधिकारी हा पाठ्यक्रम पूर्ण केलेला असावा

किंवा

दि इन्स्टीट्यूट ऑफ फायर इंजिनिअर्स (यु.के) किंवा (इंडिया) या संस्थेकडून Grade-I पदवी प्राप्त केलेली असावी.

३. अनुभव आवश्यक नाही.
४. मराठीचे ज्ञान असणे आवश्यक (लिहिणे, वाचणे व बोलणे)
५. एमएससीआयटी परीक्षा पास असावा.

**२.** संगणक हताळणी/वापराबाबतचे ज्ञान ही एक अतिरिक्त आवश्यक अर्हता म्हणून MS-CIT किंवा तत्सम / समकक्ष परिक्षा उत्तीर्ण झाले असल्याचे प्रमाणपत्र यामधून सूट मिळणेबाबत, महाराष्ट्र शासनाचे पुरक पत्र क्र.मातंसं२०१२/प्र.क्र.२७७/३९ दि.८/१/२०१८ अन्वये,

२.१ महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.

२.२ अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदवी व पदवीका (सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवार

२.३ इंडियन सर्टिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSC) यांच्या मार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण

वरील नमूद सर्वांना MS-CIT किंवा तत्सम / समकक्ष परीक्षा उत्तीर्ण झाले असल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट देण्यात येत आहे.

**३.** गट-अ, गट-ब, गट-क मधील वाहन चालक (हलके व जड) वगळून नव्याने नियुक्ती होणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्या संगणक अर्हतेबाबत

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९/०३/२००३ नुसार ज्या पदांची निवड प्रक्रिया सुरु होईल अशा नव्याने नियुक्त होणाऱ्या सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांनी संगणक अर्हता त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांच्या सेवा समाप्त होतील,असे नमूद आहे. त्याअन्वये पनवेल महानगरपालिका पदभरती मधील गट-अ, गट-ब, गट-क मधील वाहन चालक (हलके व जड) वगळून सर्व संवर्गामध्ये अर्ज करणाऱ्या उमेदवारांना सदरचे प्रमाणपत्र upload करण्यापासून सूट देण्यात येत आहे.

**४.** लिपिक टंकलेखक पदाकरीता आवश्यक असलेली टंकलेखनाची अर्हतेमध्ये सवलत.

४- अ) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र.अपंग २०१६/प्र.क्र.११६/१६-अ, दि.१६ नोव्हेंबर, २०१६ अन्वये, लिपिक टंकलेखक पदावर अर्ज करणाऱ्या दिव्यांग उमेदवारांना जर लिपिक टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाली तर त्यांना टंकलेखनाची (इंग्रजी/मराठी) परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या कालावधीत व २ संधीत सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अवधी व संधी देण्यात आलेली आहे. तसेच सदर शासन निर्णयान्वये सद्या लिपिक टंकलेखक या पदास टंकलेनाचे (इंग्रजी/मराठी) प्रमाणपत्र upload करण्यापासून सूट देण्यात येत आहे.

४- ब) महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. अनाथ-२०२२/प्र.क्र.८४/का-०३, दि.०७/०७/२०२२ अन्वये, लिपिक टंकलेखक पदावर अर्ज करणाऱ्या अनाथ उमेदवारांना जर लिपिक टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाली तर त्यांना टंकलेखनाची (इंग्रजी/मराठी) परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या कालावधीत व २ संधीत सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अवधी व संधी देण्यात आलेली आहे. तसेच सदर शासन निर्णयान्वये सद्या लिपिक टंकलेखक या पदास टंकलेखनाचे (इंग्रजी/मराठी) प्रमाणपत्र upload करण्यापासून सूट देण्यात येत आहे.

४-क) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-१११४/प्र.क्र.२००/१६-अ, दि.०४/०९/२०१५ अन्वये, लिपिक टंकलेखक पदावर अर्ज करणाऱ्या प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, पदवीधर अंशकालीन उमेदवारांना जर लिपिक टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाली तर टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्ष इतका अवधी देण्यात येत आहे. तसेच सदर शासन निर्णयान्वये सद्या लिपिक टंकलेखक या पदास टंकलेखनाचे (इंग्रजी/मराठी) प्रमाणपत्र upload करण्यापासून सूट देण्यात येत आहे.

४-ड) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या निर्णय क्रमांक एसआव्ही २०२३/प्र.क्र.१/कार्यासन १२ दि.१२/०१/२०२३ अन्वये,

**i)** लिपिक टंकलेखक या पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांकडे केवळ मराठी टंकलेखन ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे प्रमाणपत्र असल्यास, त्याने सदर प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल. इंग्रजी ४० शब्द प्रति मिनिट टंकलेखन वेगमर्यादेचे विहित प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून ४ वर्षात प्राप्त करावयाचे असल्याने अर्ज करणाऱ्या उमेदवारांना सदर प्रमाणपत्र upload करण्यापासून सूट देण्यात येत आहे.

**ii)** तसेच लिपिक टंकलेखक या पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांकडे केवळ इंग्रजी टंकलेखन किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे टंकलेखनाचे प्रमाणपत्र असल्यास त्याने सदर प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल. मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे विहित प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून ४ वर्षात प्राप्त करावयाचे असल्याने अर्ज करणाऱ्या उमेदवारांना सदर प्रमाणपत्र upload करण्यापासून सूट देण्यात येत आहे.

उपरोक्त i) व ii) मध्ये नमूद केले प्रमाणे प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर कर्मचारी यांची वार्षिक वेतनवाढ रोखण्यात येईल.

**५. वयाच्या पुराव्यासाठी शालांत प्रमाणपत्राव्यतिरिक्त अन्य पुरावा सादर करणेबाबत.**

उमेदवाराने अर्ज भरताना पनवेल महानगरपालिकेच्या भरती पोर्टलवर जन्म दिनांक नोंदविताना "कृपया १० वी तथा समकक्ष प्रमाणपत्रावरील जन्म दिनांक नमूद करावा" असे नमूद आहे.

तथापि, आता त्यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करणेत येत आहे. वयाच्या पुराव्यासाठी खालीलपैकी कोणताही एक प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाईल. वयाचा पुरावा म्हणून खालील नमूद कागदपत्रांपैकी कोणत्याही एका पुराव्यातील जन्म दिनांक नोंदविण्यात यावी.

१. मॅट्रिकचे प्रमाणपत्र/माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (१० वी इयत्ता)
२. विहित नमुन्यातील सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले वयाचे प्रमाणपत्र

३. शासनाच्या स्थायी सेवेतील उमेदवारांच्या बाबतीत- उपरोल्लेखित प्रमाणपत्र किंवा त्यांच्या सेवा अभिलेख्यात नोंदविलेला त्यांचा जन्मदिनांक नमूद करणाऱ्या सेवा अभिलेख्यातील उताऱ्याची प्रमाणित प्रत.
४. जन्म दिनांक नमूद असलेला शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला.
५. नगर पालिका/ महानगरपालिका/ ग्रामपंचायतीचा जन्म दाखला.

**६.उद्यान पर्यवेक्षक या संवर्गाची शैक्षणिक अर्हता अद्ययावत करणेबाबत**- पनवेल महानगरपालिकेने दि.१३/०७/२०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या पदभरती जाहिरातीमध्ये उद्यान पर्यवेक्षक, गट -क या संवर्गासाठी खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता नमूद आहे.

१. मान्यताप्राप्त कृषी विद्यापीठाची बी.एससी. (हॉर्टिकल्चर्स) ॲग्रीकल्चर/ फॉरेस्ट्री पदवी/मान्यता प्राप्त विद्यापीठाची वनस्पती शास्त्रातील पदवी परीक्ष उत्तीर्ण.
२. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे.

तथापि, महाराष्ट्र शासनाचा कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्र. मकृप १०२१/प्र.क्र.६३/७ अे, दि.२२ एप्रिल, २०२१ अन्वये, उद्यान पर्यवेक्षक, गट क या पदासाठी मान्यताप्राप्त कृषी विद्यापिठाची पदवी या शैक्षणिक अर्हते शिवाय खालील अभ्यासक्रमांचा समकक्ष म्हणून समावेश करण्यात येत आहे.

१. बी. एससी (ऑनर्स) उद्यानविद्या,
२. बी. एससी (ऑनर्स) वनविद्या,
३. बी. एससी (ऑनर्स) सामाजिक विज्ञान,
४. बी.एफ.एससी (मत्स्य विज्ञान),
५. बी.टेक (कृषि अभियांत्रिकी),
६. बी.टेक (अन्नतंत्रज्ञान),
७. बी.टेक (जैवतंत्रज्ञान),
८. बी.एससी.(एबीएम)/बी.बी.एम.(कृषि)/बी.बी.ए.(ऑनर्स)कृषि व्यवसाय व्यवस्थापन

वरील पैकी कोणताही एक अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**जा.क्र.:- पमपा/आस्था/२९२३/प्र.क्र.१३/७४२/२०२३,**
**दिनांक : ३१/०७/२०२३**
**ठिकाण : पनवेल**

**सही/-**
**(कैलास गावडे)**
**उपआयुक्त (मुख्यालय)**
**पनवेल महानगरपालिका**